666

# महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई


कामगार आयुक्त यांचे कार्यालय, कामगार भवन, ई ब्लॉक , सी २०,बांन्द्रा कुर्ला संकुल, वांद्रे (पूर्व), मुंबई ४०० ०५१

संकेतस्थळ – www.mahabocw.in

दुरध्वनी व फॅक्स क्र. ०२२-२६५७२६३१ ई-मेल bocwwboardmaha@gmail.com


जा.क्र.का.आ/मइवइबाकाकमं/ मनपा /२०१९ दिनांक : 06 JUL 2019

E-TAP No.: 4838
Date (In): 13/8/19
Date (Out): 20/08/19

प्रति,

व्यवस्थापकीय संचालक,
महाराष्ट्र शहर आणि उद्योग विकास महामंडळ,सिडको)
२ रा मजला, निर्मल बिल्डिंग, नरिमन पॉइंट,
मुंबई ४०० ०२१.

CIDCO NIRMAL
Inw. No. G/NT/O/UO
No.
Date 14/8/2019
Marked To 4838
G.M. J.M.D. M.D.

16/8/19

**विषय:** महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी उपकराची रक्कम जमा करण्याबाबत.
बँक खात्यामधील बदल, सुधारित चलन नमुना व विकसित प्रणालीच्या कार्यपध्दतीबाबत

संदर्भ : १) शासन उद्योग, उर्जा व कामगार विभाग, परिपत्रक क्रमांक बीसीए २००७/ प्र. क्र. ७८८/ कामगार ७-अ, दिनांक २६.१०.२००९.
२) शासन उद्योग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक बीसीए २००९/ प्र. क्र. १०८/ कामगार ७-अ, दिनांक १७.०६.२०१०
३) शासन उद्योग, उर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्रमांक बीसीए २००९/ प्र. क्र. १०८/ कामगार ७-अ, दिनांक २१.०७.२०११.
४) इमारत व इतर बांधकाम (रोजगार व सेवाशर्ती नियमन) अधिनियम, १९९६.
५) इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याण उपकर अधिनियम १९९६.

MD-I/ E(NM)/ CAO
P. informed to all
15/8

महोदय,

इमारत व इतर बांधकाम कामगार यांचेसंदर्भात रोजगार व सेवाशर्ती तसेच त्यांची सुरक्षा, आरोग्य कल्याणवषियक व इतर संबंधित बाबींसाठी तरतूदी करण्याच्या उद्देशाने करण्यात आलेल्या इमारत व इतर बांधकाम (रोजगार व सेवाशर्ती नियमन) अधिनियम, १९९६ या केंद्रिय अधिनियमांतील तरतुदीच्या अनुषंगाने महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार नियम २००७ तयार केले आहेत. याच अधिनियमाच्या कलम १८ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करून शासनाने 'महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई' ची स्थापना केली आहे.

(HOD) (NM)
G-4838
20/08/2019

Scanned by CamScanner

या अनुषंगाने शासन उद्योग, उर्जा व कामगार विभाग, परिपत्रक क्रमांक बीसीए २००७/ प्र. क्र. ७८८/ कामगार ७-अ, दिनांक २६.१०.२००९, शासन निर्णय क्रमांक बीसीए २००९/ प्र. क्र. १०८/ कामगार ७-अ, दिनांक १७.०६.२०१० व शासन निर्णय क्रमांक बीसीए २००९/ प्र. क्र. १०८/ कामगार ७-अ, दिनांक २१.०७.२०११ अन्वये इमारत व इतर बांधकाम (रोजगार व सेवाशर्ती नियमन) अधिनियम, १९९६ तसेच इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याण उपकर अधिनियम १९९६ अंतर्गत शासकीय कामावरील उपकर वसूल करावयाची कार्यपध्दती निश्चित करणेत आली आहे. विविध आस्थापनांकडून उपकराची रक्कम जमा करणे व त्यातून इमारत व इतर बांधकाम कामगारांसाठी विविध कल्याणकारी योजना / आर्थिक सहाय्य योजनांची अंमलबजावणी या मंडळाकडून करण्यात येते.

आपल्या कार्यालयाकडून विविध प्रकल्पांना / योजनांना मान्यता देतांना बांधकामाच्या एकूण मूल्याच्या किंवा/आणि इमारत व इतर बांधकामाच्या खर्चाच्या देयकांचे प्रदान करतांना उपरोक्त अधिनियम/शासन निर्णयांनुसार इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी **१%** उपकराची रक्कम वजाती करण्यात येते व अशारितीने देयकांतून वजातीं केलेल्या रक्कमा धनाकर्ष/ आर टी जी एस द्वारे मंडळाच्या बॅक ऑफ इंडिया, ताडदेव शाखा बॅक ऑफ महाराष्ट्र बांद्रे शाखा युनियन बॅक ऑफ इंडिया, डॉ. आंबेडकर रोड शाखा मधील बॅंक खात्यामध्ये जमा करण्यात येत होती.

उपरोक्त शासन परिपत्रक / निर्णयात नमूद केल्याप्रमाणे मंडळाच्या बॅंक खात्यांमध्ये उपकर भरणा-या आस्थापनांचा तपशील बॅंक खाते विवरणपत्रात तसेच प्रकल्प/योजना तपशील, बांधकामाचा एकूण खर्च, देय व भरणा केलेली उपकर रक्कम, चलन प्रती मंडळ कार्यालयास प्राप्त होत नाहीत. वजाती केलेल्या उपकर रक्कमेची अचूकता, प्राप्त रक्कमांचा मेळ घेणे, उपकर कसूरदार (Cess defaulter) यांचा शोध बॅंकेच्या खाते विवरणपत्रावरून घेता येत नाही. या संबंधात भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक (CAG) कार्यालयाकडुन लेखाआक्षेप घेण्यात आले आहेत.

याकरिता मंडळाने सेंट्रल बॅंक ऑफ इंडिया या बॅंकेकडून संगणकीय प्रणाली विकसित करून घेतली असून सेंट्रल बॅंक ऑफ इंडियाच्या बी. के. सी., बांद्रे (पूर्व) शाखेत उपकर जमा करण्यासाठी मंडळाचे खाते उघडण्यात आले आहे. सेंट्रल बॅंक ऑफ इंडियाच्या विविध शाखांमध्ये उपकर जमा करता येणार आहे. उपकर संकलकांकडून व उपकर भरणा-या व्यकती/संस्था/आस्थापना यांचेकडून उपकरांचा भरणा चलनाद्वारे करावयाचा असून या चलनात उपकर संकलकाचा, ज्यांच्याकडून उपकराची रक्कम जमा करण्यात आली आहे त्यांचा व त्यांना मंजूर करण्यात यावयाच्या/ आलेल्या प्रकल्पांचा/योजनांचा किंवा आणि प्रदान केलेल्या देयकांचा तपशील उपकर रक्कमेच्या धनाकर्षासह बॅंकेत सादर करावयाचा आहे. चलनातील या तपशीलाची नोंद बॅंकेतील प्रणालीत नोंद घेतली जाणार आहे. प्राप्त होणा-या उपकर

Scanned by CamScanner

रक्कमेची पोहोच (acknowledgement) दिली जाणार आहे. बँकेने या प्रणालीत नोंदविलेल्या तपशील MIS अन्वये मंडळास प्राप्त होणार आहे.

मंडळाच्या दिनांक २४.०५.२०१९ रोजी पार पडलेल्या बैठकीतील ठराव क्रमांक ४९ (२)/२०१९ अन्वये सेंट्रल बँक ऑफ इंडिया कडून विकसित करण्यात आलेल्या संगणकीय प्रणालीस, उपकर जमा करण्यासाठी या बँकेत उघडण्यात आलेल्या बँक खात्यास व सुधारित चलन नमुन्यास मान्यता देण्यात आली आहे. या बैठकीतील ठरावानुसार उपकर जमा करणा-या सर्व आस्थापनामधील उपकर संकलक, उपकर निर्धारण अधिकारी, उपकर अपिलीय अधिकारी यांना बँक खात्यातील बदल, सुधारित चलन नमुना व विकसित प्रणालीच्या कार्यपध्दतीबाबत खालीलप्रमाणे कळविण्यात येत आहे.

१. बँक ऑफ इंडिया, ताडदेव रोड शाखा, मुंबई (खाते क्रमांक ००४२२०११००००१५३), बँक ऑफ महाराष्ट्र, वांद्रे (पूर्व), मुंबई (खाते क्रमांक ६८०००५५५२२०) व युनियन बँक ऑफ इंडिया, डॉ. आंबेडकर रोड शाखा (खाते क्रमांक ४४४३०२०१०१०४९२०) मधील मंडळाच्या बँक खात्यात उपकर जमा करण्याचे बंद करण्यात आले आहे. त्यामुळे या बँक खात्यांमध्ये उपकराची रक्कम जमा करण्यात येऊ नये.
२. उपकराची रक्कम प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून ३० दिवसांच्या आत सुधारित चलनाने सेंट्रल बँक ऑफ इंडिया, बी के सी शाखा, वांद्रे (पूर्व), मुंबई मधील मंडळाच्या बँक खाते क्रमांक ३६७११७८५९१ मध्ये **"महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई" (Maharashtra Building and other Construction Workers Welfare Board, Mumbai)** यांचे नांवे धनाकर्षाने/RTGS/NEFT ने बँकेत जमा करण्यात यावा. बँक खात्याचा तपशील खालीलप्रमाणे आहे. उपकराच्या रक्कमा धनादेशाने स्विकारल्या जाणार नाहीत.

| अ.क्र. | बाब | तपशील |
|---|---|---|
| १ | बँकेचे नांव | सेंट्रल बँक ऑफ इंडिया. |
| २ | बँकेची शाखा व पत्ता | बी.के.सी. शाखा,<br>प्लॉट क्रमांक सी-६, बी ब्लॉक,<br>बांद्रे (पूर्व), मुंबई -४०० ०५१. |
| ३ | खाते प्रकार | चालू खाते (Current Account) |
| ४ | खाते क्रमांक | 3671178591 |
| ५ | आय.एफ.सी. कोड (IFSC CODE) | CBIN0282611 |
| ६ | एम.आय.सी.आर.कोड (MICR CODE) | 400016073 |
| ७ | बँक शाखा ई मेल | bmmumn2611@centralbank.co.in |
| ८ | बँक शाखा दुरध्वनी | 022-26590966 |

उपकराचा भरणा बँक खात्यात करण्यासाठी असलेला चलन नमुना सुधारित करण्यात आला असून त्याची प्रत यासोबत जोडली आहे. याबाबतची अधिक माहिती, चलन नमुना व सेंट्रल बँक ऑफ

Scanned by CamScanner

इंडियाच्या विविध शाखा यांचा तपशील मंडळाच्या वेबसाईट https://mahabocw.in/ वर उपलब्ध करण्यात आला आहे.

आपला,

2.6/६

सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार
कल्याणकारी मंडळ, मुंबई.

सहपत्र: वरिलप्रमाणे.

Scanned by CamScanner